9th September,2026

To,
Listing Compliance Department
National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, Plot No. C/1,
G Block, Bandra Kurla Complex,
Bandra (E), Mumbai — 400051

Company code: ADISOFT

Sub: Disclosure of Events/ Information under Regulation 30 of SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements) Regulations, 2015

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find attached copy of a Corrected newspaper advertisement published on Wednesday, September 09, 2026 in a "Navakal" ("Marathi Newspaper") in Pune edition, regarding the 14th Annual General Meeting to be held on Tuesday, September 29th, 2026 at 03.00 p.m. through Video Conferencing / Other Audio Visual Means, e-voting information and other related information.

The newspaper clippings are enclosed for your information and records.

Thanking you,
Yours faithfully,

**For ADISOFT TECHNOLOGIES LIMITED**

AJAY CHANDRASHEKHAR PRABHU

Digitally signed by AJAY CHANDRASHEKHAR PRABHU
Date: 2026.09.09 12:18:37 +05'30'

**AJAY CHANDRASHEKHAR PRABHU**
**MANAGING DIRECTOR**
**DIN: 06473412**

## पणजीत कंत्राटी शिक्षकांच्या हकालपट्टीविरोधात विद्यार्थ्यांचे धरणे

■ पणजी

**आठपेक्षा** अधिक कंत्राटी शिक्षकांना सेवेतून कमी केल्याच्या निषेधार्थ पणजीतील टी. बी. कुन्हा उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बाल भवनासमोर धरणे आंदोलन केले. शिक्षकांना न्याय मिळेपर्यंत वर्गांवर बहिष्कार टाकून आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा विद्यार्थ्यांनी सरकारला दिला आहे.

काम्पाल येथील टी. बी. कुन्हा उच्च माध्यमिक विद्यालयातील सुमारे ५० विद्यार्थी शनिवारी सकाळी वर्गाबाहेर पडले आणि बाल भवनासमोरील रस्त्याच्या कडेला बसून जोरदार निदर्शने केली. शिक्षकांना कोणतीही पूर्वकल्पना न देता रातोरात सेवेतून कमी करण्यात आल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला. शाळेतील आठ शिक्षकांना आतापर्यंत सेवेतून कमी करण्यात आले असून, त्यांच्या जागी माध्यमिक शाळांतील शिक्षकांना पदोन्नती देऊन नियुक्त करण्यात आल्याचे विद्यार्थिनी हवीला हिने सांगितले.

## मणिपुरातील रुग्णालयात सेवा करा उच्च न्यायालयाचा अनोखा आदेश

■ नवी दिल्ली


**दिल्ली** उच्च न्यायालयाने मित्रांमध्ये झालेला वाद सामंजस्याने मिटल्यानंतर त्यांच्याविरुद्धचा एफआयआर रद्द केला. मात्र हा निर्णय देताना न्यायमूर्ती प्रतीक जालान यांनी दोन्ही आरोपींना मणिपुरातील रुग्णालयात समाजसेवा करण्याचा अनोखा आदेश दिला.

आरोपी आणि तक्रारदार हे अजूनही मित्र आहेत आणि त्यांच्यात आता कोणताही वाद उरलेला नाही. त्यामुळे पुढील कायदेशीर कारवाई निरर्थक ठरेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. दोन्ही आरोपींना मणिपूरमधील 'रिजनल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस'या रुग्णालयात प्रत्येकी २ तासांचे एकूण ६ सत्र (एकूण १२ तास) समाजसेवा करावी लागणार आहे. ही समाजसेवा पुढील दोन महिन्यांत पूर्ण करणे बंधनकारक आहे. सेवा पूर्ण झाल्यावर रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांकडून प्रमाणपत्र घेऊन ते न्यायालयात सादर करावे लागेल. याशिवाय न्यायालयाचा वेळ वाया गेल्यामुळे दोन्ही आरोपींना एकत्रितपणे १० हजार रुपये 'दिल्ली उच्च न्यायालय बार असोसिएशन'च्या फंडात जमा करण्याचे आदेशही देण्यात आले.

देश विदेश

## ऑस्ट्रेलियात सोशल मीडियावर अल्गोरिदम बंद करण्याचा पर्याय?

■ सिडनी



**ऑस्ट्रेलिया** सरकार संसदेत एक महत्त्वाचे विधेयक मांडण्याच्या तयारीत आहे. त्यानुसार ऑस्ट्रेलियन नागरिकांना सोशल मीडिया कंपन्यांचे अल्गोरिदम बंद करण्याचा पर्याय मिळणार आहे.

'डिजिटल ड्युटी ऑफ केअर'या नव्या विधेयकानुसार फेसबुक, टिकटॉक आणि गुगल यांसारख्या मोठ्या टेक कंपन्यांना त्यांच्या वापरकर्त्यांना अल्गोरिदम बंद करण्याचे स्वातंत्र्य देणे बंधनकारक असेल. वापरकर्त्याने अल्गोरिदम बंद केल्यास त्याला त्याच्या आवडीनुसार शिफारस केलेले व्हिडिओ किंवा पोस्ट दिसणार आहेत. कंपन्यांनी वापरकर्त्यांना हा पर्याय दिला नाही किंवा नियमांचे उल्लंघन केले, तर त्यांना १० कोटी ऑस्ट्रेलियन डॉलरपेक्षा जास्त (७२ दशलक्ष डॉलर)दंडाचा सामना करावा लागू शकतो. सोशल मीडियावरील व्यसन लावणारे अल्गोरिदम, सायबर बुलिंग आणि हानिकारक कंटेंटपासून नागरिकांचे विशेषतः तरुणांचे संरक्षण करणे हा यामागचा मुख्य हेतू आहे. यापूर्वी ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर बंदी घालणारा जगातील पहिला ऐतिहासिक कायदादेखील केला आहे.

## नायजेरियातील डांगोटे रिफायनरीचा आफ्रिकेतील सर्वात मोठा आयपीओ बाजारात

■ अबूजा

**नायजेरियातील** डांगोटे पेट्रोलियम रिफायनरीने आफ्रिकेच्या इतिहासातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या आयपीओच्या अधिकृत कागदपत्रांवर स्वाक्षरी केली. हा आयपीओ १४ सप्टेंबर रोजी खुला होणार असून १३ ऑक्टोबरपर्यंत गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध असणार आहे. सध्या दररोज ६,५०,००० ते ७,००,००० बॅरल तेल शुद्धीकरण करण्याची क्षमता असलेली ही रिफायनरी या निधीच्या मदतीने आपली क्षमता १४ लाख (१.४ दशलक्ष) बॅरल प्रति दिन करण्याच्या तयारीत आहे.ही उद्दिष्टपूर्ती झाल्यास ती जगातील सर्वात मोठी 'सिंगल-ट्रेन' रिफायनरी बनेल. कंपनी आपल्या सार्वजनिक विक्रीद्वारे ४.१ अब्ज शेअरची विक्री करणार असून प्रति शेअर ५२५ नायरा ही किंमत निश्चित करण्यात आली. याद्वारे सुमारे २.१५ ट्रिलियन नायरा (१.६ अब्ज डॉलर) उभे केले जातील.

## सिएरा लिओनचे माजी अध्यक्ष कोरोमा २ वर्षांनी मायदेशी परतले

■ फ्रीटाऊन



**सिएरा** लिओनचे माजी अध्यक्ष अर्नेस्ट बाई कोरोमा यांच्यावरील देशद्रोहाचा खटला मागे घेतल्यानंतर ते नायजेरियातील २ वर्षांच्या वास्तवानंतर आपल्या देशात परतले. ७२ वर्षीय कोरोमा यांचे फ्रीटाऊन विमानतळावर परराष्ट्र मंत्र्यांनी आणि त्यांच्या ऑल पीपल्स काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी स्वागत केले. नोव्हेंबर २०२३ मध्ये सिएरा लिओनमध्ये लष्करी छावण्या आणि तुरुंगांवर सशस्त्र हल्ला करून २,२०० कैद्यांना सोडवण्यात आले होते. हा सत्तापालटाचा अयशस्वी प्रयत्न असल्याचे सरकारने म्हटले होते. या कटात सहभागी असल्याच्या आरोपावरून जानेवारी २०२४ मध्ये कोरोमा यांच्यावर देशद्रोहाचे ४ गुन्हे दाखल करण्यात आले होते. खटला सुरू असतानाच जानेवारी २०२४ मध्ये सिएरा लिओनच्या न्यायालयाने त्यांना वैद्यकीय उपचारांसाठी परदेशी जाण्याची परवानगी दिली होती. पश्चिम आफ्रिकन देशांची संघटना 'इकोवास'च्या मध्यस्थीनंतर ते नायजेरियात तात्पुरत्या आश्रयाला गेले होते.

## राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा प्रथमच दिल्लीबाहेर

■ नवी दिल्ली

गुजरातमधील केवडियात आयोजन




७२ वर्षांच्या इतिहासात प्रथमच राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार पुरस्कार सोहळा नवी दिल्लीबाहेर आयोजित केला जाणार आहे. यंदाचा ७२ वा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा गुजरातमधील 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' परिसरात (केवडिया) पार पडणार आहे.

१९५४ मध्ये राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची सुरुवात झाल्यापासून हा सोहळा नेहमी नवी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित केला जात होता. यंदा ही ७ दशकांहून अधिक काळ चालत आलेली परंपरा मोडीत निघणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत हा सोहळा २२ सप्टेंबरला गुजरातमधील प्रसिद्ध 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'परिसरात होणार आहे. 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'हे भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आणि प्रमुख जागतिक पर्यटनस्थळ आहे. यंदाच्या ७२ व्या राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये चित्रपट निर्माते आनंद एल. राय यांच्या 'स्टॅच्यू ऑफ युनिटी -एकता का प्रतीक'ला सर्वोत्कृष्ट माहितीपटाचा पुरस्कार मिळाला आहे, त्यामुळे या ठिकाणाचे महत्त्व वाढले आहे.

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत ७ महत्त्वाचे निर्णय

■ मुंबई

**मंत्रिमंडळाच्या** बैठकीत आज खेळाडूंच्या नोकरीतील ५ टक्के आरक्षणाचे सुधारित धोरण, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था मजबूत करण्यासाठी 'प्रगती' प्रकल्प यासह विविध विषयांवर ७ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. तसेच काही संस्थांना जमीन देणे, भाडेपट्ट्याचे नूतनीकरण आणि कंपनीला भांडवली अनुदान देण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

यामध्ये यशस्वी खेळाडूंना शासकीय, निमशासकीय आणि इतर क्षेत्रांत नोकरीसाठी असलेल्या ५ टक्के आरक्षणाचे सुधारित धोरण मंजूर करण्यात केले, यापूर्वीचे सर्व शासन निर्णय, शुद्धिपत्रके, परिपत्रके व पत्रे रद्द करण्यात आली आहेत. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था मजबूत करण्यासाठी 'प्रगती' प्रकल्पाला मंजुरी देदिली, तो २०२६ ते २०३१ या कालावधीत राबविला जाणार आहे. यासाठी आशियाई विकास बँकेकडून कर्ज घेण्यास व राज्य शासनाचा हिस्सा समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली. ह्योसंग इंडिया प्रा. लि. यांना भांडवली अनुदान देण्यास, सोलापूर जिल्ह्यातील माढा येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय सुरू करण्यासाठी आवश्यक पदे व खर्चाची तरतूद करण्यास मंजुरी दिली. मुंबईतील कैवल्यधाम ईश्वरदास चुन्नीलाल योगिक सेंटरच्या भाडेपट्ट्याचे सवलतीच्या दराने नूतनीकरण, चेंबूर येथील भिक्खू संघ युनायटेड बुद्धिस्ट मिशन संस्थेला त्यांच्या वहिवाटीतील जमीन देणे, तसेच नागपूरमधील कोराडी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील शासकीय जमीन श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानाला देण्यासही मंजुरी दिली.

## दिल्ली विधानसभेला बॉम्बने उडवण्याची धमकी

**नवी दिल्ली-** दिल्ली विधानसभेला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाल्याने खळबळ उडाली. आज सकाळी ८.३९ वाजताच्या सुमारास विधानसभा अध्यक्षांच्या अधिकृत ई-मेलवर धमकीचा संदेश आला. विधानसभा परिसर बॉम्बने उडवून देण्याची धमकी या ई-मेलमध्ये देण्यात आली होती.

धमकीचा ई-मेल मिळताच पोलिसांना माहिती देण्यात आली. त्यानंतर दिल्ली पोलिसांचे पथक विधानसभा परिसरात दाखल झाले. पोलिसांनी परिसराची कसून तपासणी केली. मात्र, तपासणीत कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही.

## गौतमी पाटील विरोधात भाजपा नगरसेविकेची तक्रार

**ठाणे** - दहीहंडीच्या कार्यक्रमात नृत्यांगनांना नाचवण्याच्या मुद्द्यावरून सुरू असलेला वाद आता ठाण्यातही पोहोचला आहे. लावणी कलाकार गौतमी पाटील यांच्या नृत्यावर आक्षेप घेत ठाणे महापालिकेतील भाजपा नगरसेविका मृणाल पेंडसे यांनी नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. गौतमी पाटील यांच्यासह कार्यक्रमाच्या आयोजकांवरही कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पेंडसे यांनी केली. तक्रार दाखल केल्यानंतर मृणाल पेंडसे म्हणाल्या की, त्या कोणत्याही राजकीय हेतूने पोलिसांत तक्रार केलेली नाही. एक महिला म्हणून ही तक्रार करत आहे.


SBI
भारतीय स्टेट बँक
कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००२१

**सूचना**

भागधारकांच्या हे निर्देशनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भागाचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भागासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे इश्यूसाठी रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए) मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फाइनेंसियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद, तेलंगणा - ५०० ०३२ (इमेल आयडी: **einward.ris@kfintech.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

भारतीय स्टेट बँक

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक |  | विभिन्न क्रमांक |  |
|---|---|---|---|---|---|---|---|
|  |  |  |  | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| १ | ०२५६२८२२ | शेषु विठ्ठल | १२०० | २००७१८ | २००७१८ | ७४४७६७२८४१ | ७४४७६७४०४० |
| २ | ०७४०६२०५ | जोस थॉमस (मृत)<br>सुसम्मा जोस थॉमस<br>श्रीदेवी मरियम थॉमस | १९८० | ६२०६८८६ | ६२०६८८६ | ८०११८५३८६५ | ८०११८५५८४४ |

**वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** ०९.०९.२०२६
समभागांची संख्या: **३१८०**
स.प्रमाणपत्रांची संख्या: **२**
महाव्यवस्थापक
(शेअर्स व बॉण्ड्स)



**सार्वजनिक सूचना**

याद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना सूचित करण्यात येते की, १) श्री. दर्शन सिंग अवतार सिंग गिल (वय ३५ वर्षे), २) श्रीमती जसदीप कौर अवतार सिंग गिल (वय ५४ वर्षे) आणि ३) श्री. अवतार सिंग सुरजित सिंग गिल (वय ६३ वर्षे) हे 'पंत नगर एम्बसी सीएचएस लि.', स्वामी समर्थ मार्ग, पंत नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७५ येथील फ्लॅट क्र. ए१४०४ चे संयुक्त मालक आहेत. त्यांनी या फ्लॅटसाठी १२.०७.२०१९ रोजी विक्री करारनामा केला असून, त्याची नोंदणी उप-निबंधक मुद्रांक शुल्क कुर्ला-२, मुंबई यांच्या कार्यालयात नोंदणी क्रमांक ८५१६/२०१९ अन्वये करण्यात आली आहे. 'पंत नगर एम्बसी सीएचएस लि.' च्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना शेअर प्रमाणपत्र क्र. ५७ दिनांक ३१.०३.२०२४ जारी केले आहे, ज्यामध्ये ५६१ ते ५७० हे विशिष्ट शेअर क्रमांक समाविष्ट आहेत. मूळ शेअर प्रमाणपत्राची प्रत आणि इतर मूळ कागदपत्रे 'यूको बँक' (UCO Bank), घाटकोपर (पूर्व), मुंबई येथे सादर करून त्यांनी सदर फ्लॅट वर गृहकर्ज सुविधा घेतली होती. फ्लॅट मालकांनी बँकेला कर्जाची संपूर्ण रक्कम परत केली आणि मूळ कागदपत्रे परत करण्याची विनंती केली. परंतु, मूळ शेअर प्रमाणपत्र क्र. ५७ हरवल्यामुळे बँक ते प्रमाणपत्र मालकांना परत करू शकली नाही. बँकेने सदर शेअर प्रमाणपत्राबाबत १ सप्टेंबर २०२६ रोजी हरवल्याची तक्रार नोंदवली आहे. आता खरेदीदारांनी 'पंत नगर एम्बसी सीएचएस लि.' च्या पदाधिकाऱ्यांकडे सदर शेअर प्रमाणपत्राची प्रत जारी करण्याची विनंती केली आहे. तरी, जर कोणत्याही व्यक्तीकडे किंवा वित्तीय संस्थेकडे सदर शेअर प्रमाणपत्राची मूळ प्रत असेल, तर त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी ती प्रत या सूचनेच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत, सायंकाळी ५ ते ७ या वेळेत, खाली सही करणाऱ्याच्या कार्यालयात (पत्ता: ५१२ ए, कैलास एस्प्लेनेड, एल.बी.एस. मार्ग, घाटकोपर (पश्चिम), मुंबई ४०००८६) सादर करावी; अन्यथा, सोसायटीचे पदाधिकारी खरेदीदारांना शेअर प्रमाणपत्राची नवीन प्रत जारी करतील.

**दिनांक ९ सप्टेंबर २०२६.**
**सही/-**
**चंद्रकांत बी. पोफळे**
**उच्च न्यायालय वकील, मुंबई.**


## भारतातील सॅमसंग कंपनीतून १०० अधिकाऱ्यांना काढले

■ नवी दिल्ली

**वाढता** खर्च, कमकुवत होत असलेली मागणी आणि नफ्याच्या मार्जिनवर वाढत असलेला दबाव यामुळे सॅमसंग इंडियाने कर्मचारी कपातीला सुरुवात केली. कंपनीच्या टीव्ही आणि होम अप्लायन्सेस व्यवसायातील सुमारे ८० ते १०० अधिकाऱ्यांना कंपनी सोडण्यास सांगण्यात आल्याची माहिती आहे. ही कर्मचारी कपात टप्प्याटप्प्याने केली जात आहे. या कपातीचा फटका कंपनीच्या मुख्यालयातील डायरेक्टर स्तरावरील अधिकारी, टीम लीडर्स तसेच ब्रांच आणि एरिया मॅनेजर्सना बसला आहे. सॅमसंगच्या भारतातील इलेक्ट्रॉनिक्स व्यवसायाच्या विक्री आणि मार्केटिंग विभागात सुमारे ५५० ते ६०० अधिकारी कार्यरत आहेत. यामध्ये स्मार्टफोन विक्रीच्या स्वतंत्र नेटवर्कचा समावेश नाही.

## गोंदिया-बालाघाट महामार्गावर भीषण अपघात! सहा जणांचा मृत्यू

■ गोंदिया

**गोंदिया**-बालाघाट महामार्गावर नागरा- मोहरनटोलीजवळ भरधाव ट्रक आणि पिकअप वाहनाची समोरासमोर जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात पिकअपमधील सहा जणांचा जागीच मृत्यू, तर सात जण गंभीर जखमी झाले. अपघातातील सर्वजण मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील रहिवासी होते. , सकाळच्या सुमारास पिकअपमधून काही मजूर कामासाठी हैदराबादला जात होते. त्यावेळी भरधाव ट्रकने पिकअपला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की पिकअप वाहनाचा अक्षरशः चक्काचूर झाला. या अपघातात आरुष मात्रे, किरण संतोष वैद्य, संतोष मात्रे, सुशीला मात्रे, रूपसेन सत्यकार आणि ज्योती सत्यकार यांचा मृत्यू झाला. मृतांपैकी सर्वजण बालाघाट जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातील रहिवासी होते.

## अमरावतीत शेतकऱ्यांचे अर्धनग्न आंदोलन

■ अमरावती

**पावसाने** ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली आहेत. कोरडा दुष्काळ जाहीर करण्यासह सरसकट कर्जमाफीच्या मागणीसाठी अमरावतीत शेतकरी आक्रमक झाले. शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात अर्धनग्न होत शेतकऱ्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयावर डेरा आंदोलन सुरू केले. आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी मागणी केली की, यावर्षी हंगामात पावसाची सुरुवात चांगली झाली असली तरी त्यानंतर पावसाने दडी मारल्याने पिकांवर मोठे संकट ओढावले आहे. अनेक भागांत पिकांना आवश्यक पाऊस न मिळाल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. त्यामुळे सरकारने परिस्थितीची तातडीने दखल घेऊन सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करावा.


SBI-SG
One Stop Solution For All Investments
**SBI-SG GLOBAL SECURITIES SERVICES PVT. LTD.**
B-Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) Building,
SVP Road, Santacruz (W), Mumbai – 400054, Maharashtra, India

**TENDER NOTICE**

Chief Administrator & Financial officer, SBI-SG Global Securities Services Pvt Ltd, B Wing, Ground Floor, Jeevan Seva Annex (LIC) building, SVP Road, Santacruz – W, Mumbai – 400054, Maharashtra, India invites sealed bids from eligible bidders (Eligibility, Technical Bid and Commercial Bid) from authorized OCI Managed service providers as per requirement mentioned in RFP number **RFP / SBISG GSS /26-27 /012 DATED 09-09-2026**. The complete set of bidding documents along with schedule of events can be downloaded from our website **https://www.sbisgcsl.co.in/statutory/ "TENDER"** section. Complete set of bidding documents may be submitted in sealed envelopes on or before 25th Sept 2026 by 11:30 pm at our registered office.

**Sd/-**
**(Amitav Kar)**
**Chief Financial Officer**



**आदिसॉफ्ट टेक्नॉलॉजीज लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** प्रथमेश कॉम्प्लेक्स अँड ट्रेडिंग, प्लॉट क्र.पीएपी-बीजी-१०२, १०३, १०४ आणि १०५, पहिला आणि दुसरा मजला, एमआयडीसी चिंचवड औद्योगिक क्षेत्र, भोसरी आय.ई., पुणे, पुणे शहर, महाराष्ट्र, भारत, ४११०२६. **दूर.:** +९१ ८२०८७८११०२,
**ई-मेल:** cs@adisoft.co.in, **वेबसाइट:** www.adisoft.co.in
**सीआयएन क्र.:** L31108PN2013PLC146157

**१४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंदर्भात भागधारकांना सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आदिसॉफ्ट टेक्नॉलॉजीज लिमिटेड ('कंपनी') च्या भागधारकांची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') कंपनीच्या एजीएमच्या सूचनेत नमूद केल्यानुसार व्यवसायावर विचारविमर्श करण्यासाठी, मंगळवार, २९ सप्टेंबर, २०२६ रोजी दुपारी ३:०० वा. (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी') /अन्य दृकश्राव्य माध्यम ('ओएव्हीएम') द्वारे आयोजित केली जाईल.

कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम, सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) विनियम, २०१५ यांच्या लागू तरतुदींचे पालन करून, तसेच सहकार मंत्रालय ('एमसीए') आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी') यांनी जारी केलेल्या सर्व लागू परिपत्रकांसह, कंपनीची एजीएम केवळ व्हीसी/ओएव्हीएम द्वारेच आयोजित केली जाईल. एजीएमचे मानले जाणारे ठिकाण कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय असेल.

याव्यतिरिक्त, एमसीए आणि सेबीच्या लागू परिपत्रकांनुसार, ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी कंपनीच्या वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना ७ सप्टेंबर, २०२६ रोजी केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्या सर्व भागधारकांना पाठवण्यात आली आहे ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/ डिपॉझिटरी सहभागीदाराकडे नोंदणीकृत आहेत. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी कंपनीच्या एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवालाची ई-प्रत कंपनीच्या www.adisoft.co.in या वेबसाइटवर, कंपनीचे इक्विटी शेअर्स सूचीबद्ध असलेल्या स्टॉक एक्सचेंजच्या nseindia.com या वेबसाइटवर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('एनएसडीएल') च्या evoting.nsdl.com या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

कंपनी भागधारकांना एजीएम मध्ये मंजूर होणाऱ्या सर्व ठरावांवर मतदान करण्याचा हक्क बजावण्यासाठी रिमोट ई-मतदान सुविधा प्रदान करत आहे. भागधारकांना इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली वापरून मतदान करण्याची आणि एजीएम मध्ये ई-मतदानासह व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे सहभागी होण्याची सुविधा एनएसडीएलद्वारे प्रदान केली जाईल. व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएम मध्ये सामील होण्याची आणि सभेदरम्यान ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची सविस्तर प्रक्रिया एजीएमच्या सूचनेत दिलेली आहे. कायद्याच्या कलम १०३ अन्वये गणपूर्ती मोजण्याच्या उद्देशाने, व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएम मध्ये उपस्थित राहणाऱ्या भागधारकांची गणना केली जाईल.

रिमोट ई-मतदान कालावधी २६ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ०९:०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि २८ सप्टेंबर, २०२६ रोजी सायं.०५:०० वा. (भाप्रवे) समाप्त होईल. याव्यतिरिक्त, एजीएमच्या कामकाजादरम्यान आणि सभा संपण्याच्या १५ (पंधरा) मिनिटांपर्यंत इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्याची सुविधा देखील उपलब्ध करून दिली जाईल.

कंपनीने एजीएममध्ये रिमोट ई-मतदान आणि ई-मतदानाद्वारे मतदान करण्यासाठी भागधारकांची पात्रता निश्चित करण्याकरिता २२ सप्टेंबर, २०२६ ही 'रेकॉर्ड तारीख' निश्चित केली आहे. रेकॉर्ड तारखेनुसार ज्या व्यक्तीचे नाव सभासदांच्या नोंदवहीमध्ये/लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये नोंदवलेले आहे, तीच व्यक्ती रिमोट ई-मतदान तसेच एजीएममध्ये ई-मतदानाच्या सुविधेचा लाभ घेण्यास पात्र असेल. ज्या भागधारकांनी रिमोट ई-मतदानाद्वारे आपले मत नोंदवले आहे, ते एजीएम मध्ये सहभागी होऊ शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा हक्क असणार नाही.

एजीएमची सूचना पाठवल्यानंतर कंपनीचा भागधारक बनलेली आणि रेकॉर्ड डेटला भाग धारण करणारी कोणतीही व्यक्ती, एजीएमच्या सूचनेत दिलेल्या पद्धतीने युझर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदानासंबंधी कोणत्याही प्रश्नांसाठी, भागधारक श्री. स्मिथ गुळवे, एनएसडीएल यांच्याशी evoting@nsdl.com या ई-मेल आयडीवर किंवा ०२२-४८८६ ७००० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधू शकतात. आपण evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेले भागधारकांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) आणि भागधारकांसाठी ई-मतदान वापरकर्ता पुस्तिका यांचाही संदर्भ घेऊ शकता.

आदिसॉफ्ट टेक्नॉलॉजीज लिमिटेडकरिता
सही/-
अजय चंद्रशेखर प्रभू
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ०६४७३४१२

दिनांक: ८ सप्टेंबर, २०२६
ठिकाण: पुणे



**पुणे महानगरपालिका, पुणे**
**निविदा प्रक्रिया कक्ष**
**ई-निविदा जाहिरात -फेर निविदा जाहिरात**

**विक्री कालावधी दिनांक :- ०९/०९/२०२६ ते १६/०९/२०२६ दुपारी २.३० वाजेपर्यंत.**
**स्वीकृती दिनांक :- ०९/०९/२०२६ ते १६/०९/२०२६ दुपारी २.३० वाजेपर्यंत. तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :- १७/०९/२०२६ दुपारी ३.०० वाजेनंतर**

| अ. क्र. | निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु. | अंदाजित पूर्व गणित र.रु. | बयाणा रक्कम रु. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ ELECTRICAL/ 2026/87 | विद्युत विभाग | पुणे मनपाच्या परिमंडळ क्र. ३ मधील विविध इमारतींमधील लिफ्टचे ऑपरेटिंग करणे. | १३५९.०० | २४९०२१३.०० | २४९०२.०० | १२ महिने | श्री. रजत बोबडे ८७८८३११९१७ |

निविदा संचाची विक्री https://mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा सुचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरू राहील. सविस्तर निविदा https://mahaetenders.gov.in
सदरची ई निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ईमेल support-eproc@nic.in अथवा Help Desk Numbar 0120-4200462,0120-4001002 या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/७३९ दि.०८/०९/२०२६



**पुणे महानगरपालिका, पुणे**
**निविदा प्रक्रिया कक्ष विद्युत विभाग**
**निविदा जाहिरात - नवीन कामे**

विक्री कालावधी दिनांक:- ०९-०९-२०२६ ते २१-०९-२०२६ दुपारी १४:३० पर्यंत
स्वीकृती दिनांक:- ०९-०९-२०२६ ते २१-०९-२०२६ दुपारी १४:३० पर्यंत    तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक:-२२-०९-२०२६ दुपारी १५:००

| निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु. | अंदाजित पूर्वगणित रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/ELECTRICAL/ 2026 /208 | विद्युत | पुणे शहरातील शनिवारवाडा, नानावाडा, लालमहल व इतर ऐतिहासिक वास्तूंमध्ये तात्पुर्ती विद्युत विषयक कामे करणे. | रु ६०७९/- | रु ८४७३३८९/- | रु ८४७३४/- | ३ | Bhagyashree Uday Deshpande ९६८९९३६५४० |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामाचे निविदा www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा प्रक्रियेच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाईन निविदा प्रक्रिया बाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न. पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र.अतिमआ(वि)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम इ.सी.एस./आर.टी.जी.एस./एन.एफ.टी. सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
**Yogesh Mali**
कार्यकारी अभियंता,
विद्युत
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/७५१ दि. ०८/०९/२०२६